लोकमत



सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त उपस्थित असलेले विद्यार्थी.

# सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

राजुरी : येथील सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी महाविद्यालय आणि मेकॅनिकल स्टुडंट असोसिएशन (मेसा) या विद्यार्थी संघटनेच्या वतीने शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शिवरायांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी शिवरायांचा पोशाख परिधान करुन शिवरायांचे व्यक्तिमत्त्व सादर केले. त्याचबरोबर शिवव्याख्यात्या पूजा जाधव यांचे व्याख्यान झाले. त्यांनी शिवाजी महाराजांचे चरित्र, पराक्रम, निग्रह आणि दृष्टिकोन सांगताना शिवरायांच्या आदर्श जीवनाचा आदर्श घ्यावा, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले आणि बहिर्जी नाईक यांचे स्वराज्यासाठी योगदानही सांगितले. पल्लवी भोर या विद्यार्थिनीने शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा पोवाडा सादर केला. तदनंतर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या ४० विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी रक्तदान केले. या वेळी उपप्राचार्य पी. बालारामुडु, प्रा. आर. एम. शेळके, अमोल पाटील, ग्रंथपाल उद्धव भारती, मनोजकुमार, नीलेश पिंजरकर, मानिकंटा रेड्डी, योगेश राऊत, मेसा समन्वयक प्रा. दीपक कुमार, सीताराम कणसे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन मेसा या विद्यार्थी संघटनेने केले.